लोकमत

# 'तुकारामबावांच्या गाथेचे निरुपण'चे उद्या प्रकाशन

कोल्हापूर : मारुती भाऊसाहेब जाधवकृत 'तुकारामबावांच्या गाथेचे निरुपण भाग एक व दोन' या ग्रंथाचे प्रकाशन शुक्रवारी (दि. २९) दुपारी तीन वाजता होणार आहे. शिवाजी विद्यापीठातील संत तुकाराम अध्यासनातर्फे आयोजित हा कार्यक्रम शाहू सभागृहात होईल.

संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते ग्रंथाचे प्रकाशन केले जाईल. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, तर प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, मारुती जाधव, ज्येष्ठ लेखक राजन गवस, आदी उपस्थित असणार आहेत, अशी माहिती डॉ. नंदकुमार मोरे यांनी दिली.

# कुलगुरु चषक स्पर्धेत आज उपांत्य फेरीतील सामने

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सुरु असलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कर्मचारी 'कुलगुरु चषक टी २०' क्रिकेट स्पर्धेत आज, गुरुवारी उपांत्य फेरीचे दोन्ही सामने होणार आहेत. उद्या, शुक्रवारी सकाळी ८.३० वाजता तिसऱ्या स्थानासाठीचा सामना होईल. दुपारी एक वाजता अंतिम सामने आहे.

लोकमत

# संविधान आत्मीयतेने समजून घेणे आवश्यक

## श्यामसुंदर मिरजकर : विद्यापीठात व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विद्यार्थी, शिक्षकांनी आपापल्या विषयासंदर्भातील भारतीय संविधानाच्या योगदानाचे संशोधन केले पाहिजे. आपण संविधान आत्मीयतेने समजावून घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्यामसुंदर मिरजकर यांनी सोमवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्यावतीने संविधान दिनानिमित्त ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान’ या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन होते. डॉ. मिरजकर म्हणाले, भारतातल्या कनिष्ठ समजल्या गेलेल्या समाजाच्या मानेवर पारंपरिक व्यवस्थेने लादलेले गुलामगिरीचे जोखड भिरकावून देऊन नष्ट करण्याचे महान कार्य डॉ. आंबेडकर यांनी केले. या व्याख्यानास डॉ. पी. एस. कांबळे, ए. बी. कांबळे, के. डी. सोनवणे, डॉ. रामोत्रा, पवनकुमार गायकवाड, कास्ट्राईब संघटनेचे आनंद खामकर, कुमार कांबळे, आदी उपस्थित होते. सलमान काकतीकर, सचिन देठे, सुशांत पंडित, विक्रम कांबळे यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. अविनाश भाले यांनी प्रास्ताविक केले. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले.

# उद्या तुकाराम गाथा खंडांचे प्रकाशन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनातर्फे 'तुकारामबावांच्या गाथेचे निरुपण' या दोन खंडांचे प्रकाशन संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते शुक्रवारी (ता. २९) दुपारी ३ वाजता होणार आहे. मारुती जाधव यांनी गाथेचे निरुपण केले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या शाहू सिनेट सभागृहात हा प्रकाशन सोहळा होणार आहे. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी असतील. प्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, निरुपणकार जाधव, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस, मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, आदी उपस्थित राहणार आहेत, तरी कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि संत तुकाराम अध्यासनाचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले आहे.

# डॉ. ऊर्मिला पोळ यांची निवड

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संगणकशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. ऊर्मिला पोळ यांची स्पेन येथील बार्सिलोना येथे होणाऱ्या 'मुडलमूट ग्लोबल २०१९' या जागतिक परिषदेसाठी निवड झाली आहे. या परिषदेत सहभागी होणाऱ्या डॉ. पोळ या विद्यापीठाच्या पहिल्याच प्राध्यापिका व देशातर्फे एकमेव प्रतिनिधी म्हणून सहभागी होणार आहेत. या परिषदेत डॉ. पोळ या 'ॲक्टीव्ह लर्निंग अप्रोच एच फाइव्ह ॲक्टीव्हीटी इन मुडल' या विषयावर शोधनिबंध सादर करणार आहेत. विद्यार्थ्यांना अधिक काळ व्यस्त ठेवण्यासाठी मुडल प्रणालीमध्ये एच फाइव्ह व परस्परसंवादी व्हिडिओ मनोरंजक बनवता येतो हा सिद्धांत त्या प्रात्यक्षिकाद्वारे मांडणार आहेत.

# ‘तुकाराम बावांच्या गाथेचे निरूपण’ ग्रंथाचे उद्या प्रकाशन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ व संत तुकाराम अध्यासनातर्फे मारुती जाधव (तळाशीकर गुरुजी) यांच्या ‘तुकाराम बावांच्या गाथेचे निरूपण’ या ग्रंथाच्या भाग १ व २ चे प्रकाशन करण्यात येणार आहे. शुक्रवार दि. २९ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजता, शिवाजी विद्यापीठातील शाहू सिनेट सभागृहात हा प्रकाशन सोहळा होईल. संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते आणि कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते होणाऱ्या प्रकाशन सोहळ्यास प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, ज्येष्ठ लेखक राजन गवस, मराठी विभागप्रमुख प्रा. रणधीर शिंदे, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. यावेळी उपस्थित राहाण्याचे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर व संत तुकाराम अध्यासनाचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

# 'ग्यान'ने ज्ञानात भर

## ७ प्राध्यापकांचे मार्गदर्शन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे पुरस्कृत ग्लोबल इनिशिएटीव्ह ऑफ ॲकेडेमिक नेटवर्क्स (ग्यान) या उपक्रमास शिवाजी विद्यापीठात दि. ६ जून २०१६ पासून सुरुवात करण्यात आली. जगभरातील ७ नामांकीत प्राध्यापकांनी आजवर मार्गदर्शन केले असून या उपक्रमामुळे ज्ञानात भर पडल्याची भावना विद्यार्थी तसेच प्राध्यापकांत आहे.

जागतिकीकरणाच्या अनुषंगाने उच्च शिक्षणामध्ये आमूलाग्र बदल घडत आहेत. या पार्श्वभूमीवर आपले विद्यार्थी जगाच्या पातळीवर ताठ मानेने उभे राहावेत, यासाठी केंद्र शासनाने विविध उपक्रम हाती घेतले. भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाने (एमएचआरडी) या साठीच ग्लोबल इनिशिएटीव्ह ऑफ ॲकेडेमिक नेटवर्क्सची (ग्यान) सुरुवात केली. जगाच्या पाठीवर वैज्ञानिक, शिक्षक आणि उद्योजक यांना भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेत अल्पकालीन प्रशिक्षणासाठी आमंत्रित करणे हा ग्यान योजनेचा उद्देश आहे. २९ जून, २०१४ या दिवशी सर्व आयआयटीजच्या बैठकीमध्ये माननीय मनुष्यबळ विकासमंत्री स्मृती इराणी यांनी 'ग्यान'ची घोषणा केली. 'ग्यान'च्या पहिल्या टप्प्यामध्ये नामांकित आयआयटी,



आयआयएम व नॅक 'अ' मानांकित विद्यापीठे अशा शैक्षणिक व संशोधनाचा आलेख उच्च प्रतीचा असणाऱ्या शैक्षणिक संस्थांना समाविष्ट करण्याचे ठरले. शिवाजी विद्यापीठाच्या शैक्षणिक व संशोधनातील कार्यामुळेच विद्यापीठाला 'ग्यान' अंतर्गत सात अभ्यासक्रम मंजूर झाले होते.

उद्घाटनवेळीच बीजभाषण अमेरिकेतील पर्ड्यू विद्यापीठाचे डॉ. व्यंकटेश मेरवाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर 'भौगोलिक माहिती प्रणाली (जी.आय.एस.) व जलस्रोतांचे व्यवस्थापन' या विषयावर व्याख्यान दिले. तर त्यानंतर थायलंड येथील मनूकिड प्रनीचकून यांनी तर जागतिक कीर्तीचे अभ्यासक, संशोधक प्रा. स्टुअर्ट गॉर्डन यांनी मराठ्यांच्या इतिहासाचे मार्गदर्शन केले. '१८ व्या शतकातील दख्खन' हस त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. त्याच बरोबर रशिया येथील प्राध्यापक डमीटरी सोकोलोफ यांनी 'इव्होलोशनारी मारफोलोजी ऑफ लान्ड प्लान्ट' या विषयावर मार्गदर्शन केले. तर इटली येथील प्राध्यापिका अलेसांडरा यांचे हिंदी विषयावर, तर फ्रान्स येथील बेरजेर ग्रेनोबल, अमेरीका येथील मार्क डेव्हीड ब्राऊन यांनी यांची या उपक्रमाअंतर्गत व्याख्याने झाली. एकूण ५६ लाख रुपयांचा निधी या उपक्रमासाठी आला होता.

### ही व्याख्याने ठरली लक्षवेधी

एकूण सात व्याख्याने या उपक्रमाअंतर्गत पार पडली असली तरी त्यामध्ये प्रा. स्टुअर्ट गॉर्डन यांच्या मराठे शाहीवरील आणि इटली येथील प्राध्यापिका अलेसांडरा यांचे हिंदी विषयावर झालेले व्याख्यान लक्षवेधी ठरले.

### आंतरराष्ट्रीय पातळीवरील नामवंतांच्या ज्ञानाचा लाभ



ग्यान या उपक्रमामुळे शिवाजी विद्यापीठाबरोबरच इतर विद्यापीठातील विद्यार्थ्यांनाही आंतरराष्ट्रीय पातळीवरील नामांकित प्राध्यापकांकडून मार्गदर्शन उपलब्ध झाले. भविष्यात जगभरातील इतर विद्यापीठांशी सामंजस्य करार करण्यास याचा लाभ होईल. त्याची सुरुवात झालेली आहे. त्याचा फायदा विद्यार्थी आणि प्राध्यापकांना होईल.

**- डॉ. डी. टी. शिर्के,**
प्र. कुलगुरू शिवाजी विद्यापीठ

# दीक्षान्त समारंभ अर्जासाठी ७ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

कोल्हापूर, ता. २७ : शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षान्त समारंभासाठी विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागविले होते. त्यानुसार या विभागात सुमारे ५४ हजार अर्ज आले आहेत. हे अर्ज जमा करण्यासाठी विद्यापीठाने ७ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

यामध्ये विद्यार्थ्यांनी अर्ज दाखल करावेत, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक श्री. गजानन पळसे यांनी केले आहे.

अर्ज ऑनलाईन सादर करण्याची मुदत संपल्याने आणि दीक्षान्त अर्ज ऑनलाईन लिंक पीएच. डी. व्यतिरिक्त बंद झाल्याने विद्यार्थ्यांकडून दीक्षान्त विभागास विचारणा होत आहे. काही विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणीमुळे, तर काही विद्यार्थ्यांचे पुनर्मूल्यांकनाचे निकाल उशिरा जाहीर झाल्याने आणि काही विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरला आहे; परंतु पेमेंट केलेले नाही, अशा विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी तसेच अर्ज करण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत वाढविण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने घेतला आहे.

**मुदतवाढ अशी**

- २६ ऑगस्ट २०१९ ते २७ सप्टेंबर २०१९ पर्यंत, शुल्क २५०
- २८ सप्टेंबर २०१९ ते १९ ऑक्टोबर २०१९ पर्यंत विलंब शुल्क ३५०
- २० ऑक्टोबर २०१९ ते ८ नोव्हेंबर २०१९ पर्यंत अतिविलंब शुल्क ८५०
- पीएच.डी. प्राप्त विद्यार्थ्यांचे अर्ज ३० नोव्हेंबर २०१९ पर्यंत ८५० रुपये शुल्काने स्वीकारले जातील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत
28 . 2019

# भौतिकशास्त्र विभागाला 'ध्यास' संशोधनाचा

## संशोधनासह रोजगार निर्मितीत विभाग अव्वल : ४० टक्के विद्यार्थ्यांना मिळाली परदेशात संधी : उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

संशोधनाचा ध्यास घेतलेल्या भौतिकशास्त्र विभागाने उल्लेखनीय अशा विविध योजनांमुळे यंदा हा विभाग अव्वल ठरला आहे. अनेक संशोधनामुळे या विभागातील सुमारे ४० टक्के विद्यार्थ्यांना परदेशातील उच्च शिक्षणाबरोबरच नोकरीचीही संधी मिळाली आहे. अभ्यासक्रमासह विविध योजना, उपक्रमातून विभागाने आपली गुणवत्त सिद्ध केली आहे. आतापर्यंत १८४२ आंतरराष्ट्रीय संशोधन पेपर, दर्जात्मक शोधपत्रिका (इम्पॅक्ट फॅक्टर) प्रसिद्ध झाले आहेत. विभागाला संशोधनासाठी १३.५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. या सर्व कारणांमुळे शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने या विभागाचा उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार देऊन गौरव केला आहे.



### संशोधन व करार

| | |
|---|---|
| आंतरराष्ट्रीय सामंजस्य करार | १८ |
| फेलोशिप प्राप्त संशोधक | ११० |
| पुरस्कार प्राप्त प्राध्यापक | १ |
| परदेशात गेलेले विद्यार्थी | १२ |

विद्यापीठातील भौतिकशास्त्र अधिविभागामध्ये सतत नवसंशोधन केले जात आहे. दर्जेदार संशोधनामुळेच विद्यापीठाला नॅक मानांकन, एनआयआरएफ मानांकनासह राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय पातळीवर स्थान प्राप्त झाले आहे. विद्यार्थ्यांबरोबर संशोधक विद्यार्थीनाही प्रशिक्षण देऊनच कंपन्यांना पूरक मनुष्यबळ पुरवले जाते. प्रयोग शाळेतील विविध यंत्रसामुग्रीच्या हताळणीसह भाषेचेही ज्ञान दिले जाते. गेल्या पाच वर्षात ११० विद्यार्थी परदेशात संशोधन व नोकरी करीत आहेत. विद्यार्थी केंद्रीत योजनांच्या माध्यमातूनच या विभागातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेऊन बाहेर पडल्यानंतर अल्पावधीत रोजगाराची संधी उपलब्ध होते. त्यामुळेच राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर संशोधनात हा विभाग अग्रेसर आहे. विभागातील तज्ज्ञ प्राध्यापकांच्या अध्यापनाचा विद्यार्थ्यांना फायदा होतो. यंदा ३९ विद्यार्थी सेट परीक्षा उत्तीर्ण झाले असून दरवर्षी सुमारे ४० टक्के विद्यार्थ्यांना फेलोशिप मिळते. येथील 'चॉईस बेस्ड क्रेडीट सिस्टम'चा परदेशात शिक्षण घेताना विद्यार्थ्यांना उपयोग होतो.

राजाराम तलावाजवळ बसविलेल्या 'रडार' यंत्रणेमुळे विद्यार्थ्यांना अवकाशाचा अभ्यास करण्यास मदत होते. रडारच्या निरीक्षणावर आतापर्यंत ५० संशोधन पेपर प्रकाशित झाले आहेत. भाबा ॲटोमिक रिसर्च सेंटरच्या मदतीने पदार्थविज्ञान विभागात गॅमा किरण नियंत्रण ठेवण्यासाठी इरमॉन सेंटरची स्थापना झाली आहे.

### प्रकल्प आणि मिळालेले अनुदान

| प्रकल्प | संख्या | अनुदान |
|---|---|---|
| एकूण संशोधन पेपर | १८४२ | १३.५० कोटी |
| वैयक्तिक संशोधन प्रकल्प | ७० | ४.५० कोटी |
| विभागाचे संशोधन प्रकल्प | ८ | ९ कोटी |
| कार्यरत संशोधन प्रकल्प | ४ | ६.५० कोटी |
| डीएसटी फिस्ट | १ | ३ कोटी |
| केंद्र सरकार फेलोशिप | ९ | १० कोटी |
| पीआयएफसी कन्सलटन्सी | | ४० लाख |

### प्रस्तावित प्रकल्प

- सुपर कॅपॅसिटर, गॅस सेन्सर, स्मार्ट विंडोज, सोलार सेल, थेरॉटीकल फिजिक्स
- स्थानिक उद्योगांबरोबर करार करण्यासाठी चर्चा
- कोल्हापुरातील स्थानिक उद्योग फौंड्री, लेदर, गूळ या उद्योगांना प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज आहे. त्याप्रमाणे उद्योजकांशी करारासंदर्भात बोलणी सुरू आहेत.

### विद्यार्थी केंद्रीत योजनांना प्राधान्य



भौतिकशास्त्र विभागाच्या यशस्वी वाटचालीत १६ अधिभविभागप्रमुख, प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी यांचे मोलाचे योगदान आहे. या विभागात विद्यार्थी केंद्रीत योजनांना प्राधान्य देऊन राबविल्या जातात. विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षण व नोकरीसाठी मदत केली जाते.

**डॉ. पी. एस. पाटील (भौतिकशास्त्र अधिविभागप्रमुख)**